
शब्दकोडे क्र. १९३४



आडवे शब्द : १) लालनपालन, ४) पतीची दुसरी पत्नी, ६) येणे, प्रवेश करणे, १०) अस्थी, ११) कापण्याचे एक हत्यार, १३) एक धान्य, १४) डाक, १६) कष्ट, दगदग, १८) देश, २०) कडी किंवा जोडणारा घटक, २१) कमळाच्या पाकळ्या, २४) चांगले आचरण, २५) वडिलांचे बंधू, २६) रात्र, २७) मर्कट, २८) सोनार, २९) मातीचे पात्र, घडा, ३०) एक ऋतू, ३१) अक्कल, उमज, बोध, ३२) नौका, ३३) प्रश्न, ३५) संध्याकाळचा मुहूर्त, ३६) आठवण, ३७) चट्टा, ३८) सोळावं '——-' धाक्याचं गं, ४०) दावा करणारा, ४३) परिवर्तन, ४४) कामदेवाची स्त्री, ४५) पुन्हा, वापस, ४७) फुलातील पुंकेसर, ४८) कृष्णाची पालक माता, ५०) रामराम, ५३) हात, ५४) संकट, आपत्ती, ५६) संसद सदस्य, ५८) सराईत होण्यासाठी वारंवार क्रिया, ५९) मग्न, ६०) एक पक्षी, ६२) श्रीमंत (हिं.), ६४) कुशचा भाऊ, ६६) जैन धर्मातील एक देवता, ६९) जयघोष, ७०) राजवाडा.

उभे शब्द : १) विनाशक, २) साखरेची चव, ३) नाही म्हणणे, ४) एक वाद्य, ५) तक्रार करणारा, ६) आजपर्यंत, ७) तृण, ८) अभिनेता, ९) चलबिचल, १२) जुळे, १५) साधू, संत, देव यांची पादत्राणे, १७) राजगादी, १९) शिवाची नृत्यमुद्रा, २२) महाराष्ट्रातील एक विभाग, २३) सवय, २७) पंढरपूरला पायी जाणारा, २८) समजुतीने वागणारा, २९) महिना, ३१) शिक्षकांचे संबोधन (इं.), ३२) केरळमधील एक समाज, ३४) धांदल, घाई गडबड, ३५) त्वचेचा एक रंग, ३६) नेहमी, ३८) कंकण, ३९) टोळीचा प्रमुख, ४१) पगार, ४२) पापडात मिसळण्याचा क्षार, ४५) प्रथा, रूढी, चाल, ४६) संन्याशांमधील एक पदवी, ४९) दुःखाची छाया, ५१) गोवा ते कन्याकुमारी सागर किनारा मार्ग, ५२) अरबस्तानचा रहिवासी, ५४) इच्छा, ५५) मेजवानी, ५७) पंजाबमधून वाहणारी एक नदी, ६१) दात, ६३) आधुनिक काळातील एक संपर्काचे माध्यम, ६५) आयुर्मान, ६६) शूर, ६७) फणसातील एक भाग, मगज, ६८) सीतेचा पती.

शब्दकोडे क्र. १९३३ चे उत्तर

ज	शा	स	त	से			फे	र	फा	र		को	क	म
व	ल	य		व	र	वं	टा		द	म	दा	र		ग
ळ			सं	क	ट			ना	र		वे	ड	स	र
पा	व	भा	जी		र	ज	नी	श		दा	दा		म	
स	म	भा	व		ट		र		ग	वा	र		ज	प
	न		नी	रा		ग	ज	रा	ज			म	दा	र
प्र		मा		न	का	र		घ	र	टे			र	स
वा		ल	क	वा		ज		व		क	व	टी		दा
स		कं		रा		वं	श		सा	डी		का	सा	र
व	री	स			पा	त	क		व		आ	का	र	
र्ण			प	गा	र		क	मा	न		त	र	स	
न	व	रा	त्र			वा	र्ता			आ			बा	ळ
	न		का	न		य		सी		स	ह	भा	ग	
मा	रा	मा	र		आ	फ	त		सु	पा		क		ने
	ज	र			प	ळ	वा	ट		स	म	र	स	ता

अमूलच्या घशात 'गोकुळ' घालण्याचे दुर्दैवी षड्यंत्र

सतेज पाटील यांचा आरोप, कोल्हापुरात मोर्चा काढणार

लोकमत न्यूज नेटवर्क



मुंबई : कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ दूध उत्पादक संघाच्या निवडणुकीत दिलेला कौल नाकारत गोकुळवर कब्जा मिळवण्यासाठी राज्य सरकारने दुर्दैवी निर्णय घेतला आहे. पाच शासकीय सदस्य नियुक्तीचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांचा संघ अमूलच्या घशात घालण्यासाठी सर्व खटाटोप चालला आहे. महायुतीच्या या निर्णयाला न्यायालय व रस्त्यावरही कडाडून विरोध केला जाईल, असा इशारा काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनी दिला आहे.

येत्या ९ नोव्हेंबरला 'कोल्हापूरचा संघर्ष मोर्चा' काढला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. सहकार कायद्यात केलेल्या बदलातून साखर कारखाने व जिल्हा बँकांना वगळण्यात आले आहे, ही सुधारणा केवळ गोकुळपुरती मर्यादित राहणार नसून उद्या मुंबईत एसआरए प्रकल्पांच्या गृहनिर्माण संस्थांमध्ये असे शासकीय सदस्य नियुक्त करून प्रकल्पावर कब्जा केला जाऊ शकतो, अशी भीती सतेज पाटील यांनी व्यक्त केली.

> **...तर पुन्हा निवडणूक घ्यावी लागली असती**
>
> गोकुळवर संचालक नेमले नसते तर पुन्हा निवडणूक घ्यावी लागली असती. १३ जागा जिंकूनही कोरम पूर्ण होत नाही, त्यामुळे चेअरमन निवडता येत नाही. चेअरमन निवडण्यासाठी किमान १४ सदस्यांच्या कोरमची गरज आहे. त्यामुळे कायदेशीर पेचप्रसंग निर्माण झाला आहे. अध्यक्ष निवडीसाठी एक बैठक झाली. परंतु बैठकीसाठी कोरम नसल्याने ती रद्द करावी लागली. आणखी दोन बैठका घेतल्या असत्या आणि त्यात कोरम नसता तर ही निवडणूकच रद्द झाली असती. म्हणून सरकारने चार सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय घेतला.
>
> **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

> गोकुळवर सरकार प्रशासकही नेमू शकले असते, पण तसे झाले नाही. याउलट लोकशाही वाचविण्यासाठी शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार दिला आहे, शेतकऱ्यांच्या संस्थेवर प्रशासक नेमला जाऊ नये असे वाटते. शासनाचा हा निर्णय योग्य असून निर्णयाचे मी स्वागतच करतो. तसेच शासन नियुक्त सदस्य म्हणून मुलगा किंवा पराभूत उमेदवारांना संधी दिली जाणार नाही, याची काळजी घेतली जाईल
>
> **हसन मुश्रीफ,**
> कॅबिनेट मंत्री, वैद्यकीय शिक्षण विभाग

राहुल गांधी-भाजप संघर्ष तीव्र; अनेक केंद्रीय मंत्र्यांची एन्ट्री

हरीश गुप्ता
लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि इतर अनेक मंत्र्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका सुरू केल्यामुळे, आगामी काळात हा संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

सत्ताधारी पक्ष आता राहुल गांधींचे विदेशी दौरे आणि तिथल्या भेटीगाठींवर लक्ष केंद्रित करणार असल्याचे समोर येत आहे. याद्वारे, ते 'विरोधी पक्षनेतेपदासाठी अयोग्य' कसे आहेत, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भाजपमधील आक्रमक गटाचे असेही मत आहे की, जर राहुल गांधींनी या आरोपांना समाधानकारक उत्तरे दिली नाहीत, तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जावी.

राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर सत्तेत टिकून राहण्यासाठी परदेशी मदत आणि विदेशी सोशल मीडियाच्या पाठिंब्याचा आधार घेतल्याचा आरोप केल्यानंतर, दोन्ही बाजूंनी होणारे आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत.

यानंतर, भाजप नेतृत्वाने या संघर्षात पूर्ण ताकदीनिशी उडी घेतली आहे. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री निर्मला सीतारामन, गिरिराज सिंह, किरण रिजिजू, शिवराज सिंह चौहान, राजनाथ सिंह आणि इतर अनेक नेत्यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

भाजप प्रवक्त्यांनी दुहेरी नागरिकत्व, विदेशी संबंध, विदेशी निधी, अघोषित विदेशी दौरे आणि जॉर्ज सोरोससारख्या व्यक्तींच्या पाठिंब्याखालील संस्थांशी जवळीक असल्याच्या मुद्द्यांवरून प्रश्न उपस्थित केले आहेत.

...तर सरकार विशेष अधिवेशनास तयार

अमित शहा यांनी म्हटले आहे की, मतदार यादीतील सुधारणा आणि ईव्हीएम या विषयांवर थेट चर्चा करण्यासाठी सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यास तयार आहे. शहा यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा राहुल गांधींनी तीन नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदींना दुसऱ्यांदा जाहीर चर्चेचे आव्हान दिले. 'एक्स'वर एका पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, कोणतेही व्यासपीठ निवडा, कोणतेही ठिकाण ठरवा आणि माझ्याशी या विषयावर चर्चा करा - देशविरोधी कोण आहे? विदेशी शक्तींशी कोणाचे संबंध आहेत? आणि ते संबंध नेमके कशा प्रकारचे आहेत? हे लवकरात लवकर करूया. आपण दोघेही तिथे असू, मीडिया असेल आणि तरुणही तिथे उपस्थित असतील.

नशेत पत्नीवर जीवघेणा हल्ला

सोलापूर : दारूच्या नशेत असलेल्या पतीने आपल्या पत्नीवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पतीविरोधात ४ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी अंजली सुकृत पाटील मुलीसोबत गप्पा मारत बसल्या असताना पती सुकृत हा दारूच्या नशेत घरात आला. सुकृतने शिवीगाळ करत स्टीलच्या कड्याने हल्ला केला.

महावितरण — जाहीर निवेदन

महावितरण स्थापत्य विभागीय नांदेड कार्यालय अंतर्गत सर्व ठेकेदार व खाली दिलेल्या विविध कारणास्तव जे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे लेनदार आहेत अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे ३ वर्ष पूर्वीची रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit), राखून ठेवलेली (Retention) आणि बयाना रक्कम (EMD) हि निर्लेखित करावयाची आहेत. तरी स्थापत्य विभागीय कार्यालय नांदेड अंतर्गत काम केलेले सर्व ठेकेदार व विविध कारणास्तव असलेले लेनदार यानी त्याची दखल घ्यावी व आपल्याकडील मूळ जमा पावती तसेच उपलब्ध दस्तऐवजांसह रक्कम परतावा मिळविण्याकरिता अर्ज सादर करण्यात यावा. तसेच सदर यादी सूचना फलक व खाली दर्शवलेल्या अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे. तरी याबाबत हरकत असल्यास दी.**१२.११.२०२६** पर्यंत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विभागीय कार्यालय येथे संपर्क साधावा व दि. **१२.११.२०२६** नंतर सदरची रक्कम निर्लेखित केली जाईल. तसेच त्यानंतर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्थापत्य विभागीय कार्यालय नांदेड यास जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी संपर्कः स्थापत्य विभागीय कार्यालय नांदेड श्री. एस.डी. काळे उप व्यवस्थापक (विवले) (प्र.) मो. ९८३४९४१२८८.

कार्यकारी अभियंता (स्था),
PRO No.००७८ Dt. ०५.११.२०२६ स्थापत्य विभाग, महावितरण, नांदेड

महावितरण — जाहीर निवेदन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., स्थापत्य विभागीय कार्यालय, लातूर मार्फत नमूद केलेल्या क्षेत्रात ADB योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. Old MIDC उपकेंद्र उभारणीकरिता अंदाजे २००० ते ४००० चौ. मीटर (०.५ ते १ एकर) खाजगी जमीन राजीव गांधी चौक परिसर / खाडगाव रोड परिसर / जुना औसा रोड परिसर / शिवाजी चौक परिसरात आवश्यक आहे.

करिता लातूर शहर किंवा शहराजवळील इच्छुक नागरिकांनी आपल्या जमिनीची आवश्यक कागदपत्रे व प्रति चौ. मीटर / एकरी किंमत नमूद करून सीलबंद पाकीट खाली नमूद केल्यानुसार दिनांक ०६.११.२०२६ ते १६.११.२०२६ दुपारी ३.०० पर्यंत लातूर स्थित **"कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, महावितरण, कीर्ति गोल्ड मिल समोर, एमआयडीसी, लातूर"** (मो. ७८७५७६२३४६) यांच्याकडे सादर करावे.

जमिन ही रस्त्यालगत असावी, जमीन सपाट व चौरस असावी. शहरपासून १ ते १.५ किमी अंतरावर असावी. दलदलीचे, नाले कालवा जमीन नसावी.

कागदपत्राची आवश्यकता खालील प्रमाणे :

१) चालू वर्षातील ७/१२ उतारा २) चालू ८ अ उतारा ३) गाव नकाशा ४) चतुः सीमा नकाशा

५) संमती पत्र रु. १००/- च्या बॉन्डवर ६) नगरपालिका / ग्रामपंचायतीचेवा इतरचे नाहरकत प्रमाणपत्र इत्यादी. ७) एकत्रीत जमीन असल्यास संबंधितांचे नाहरकत प्रमाणपत्र.

कार्यकारी अभियंता (स्था.)
महावितरण, स्थापत्य विभाग, लातूर
मो न – ७८७५७६२३४६

PROLTR No. 153
Dt. 05.11.2026

'एमबीबीएस'च्या रिक्त जागांसाठी ऑनलाइन फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : एमबीबीएस व बीडीएस या अभ्यासक्रमाच्या शासकीय, महापालिका, शासन अनुदानित, खासगी विनाअनुदानित तसेच अल्पसंख्याक महाविद्यालयातील शिल्लक राहिलेल्या जागा भरण्यासाठी विशेष रिक्त जागांच्या ऑनलाइन प्रवेश फेरींचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यात तीन फेऱ्या पार पडतील, अशी माहिती सीईटी कक्षाने दिली.

एमबीबीएस व बीडीएस या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तीन प्रवेश फेऱ्या झाल्या असून, यानंतर शिल्लक जागांसाठी ऑनलाइन स्ट्रे व्हॅकन्सीच्या प्रवेशाच्या तीन फेऱ्या ऑनलाइन घेण्यात आल्या. यानंतरही १३८ जागा रिक्त असून त्यावर प्रवेश देण्यासाठी ही फेरी जाहीर केली आहे.

रिक्त जागा किती?

एमबीबीएस अभ्यासक्रमाची शासकीय महाविद्यालयात एकही जागा रिक्त नाही. खासगी महाविद्यालयात ३९ जागा रिक्त आहेत. खासगी विद्यापीठात ४५ अशा एकूण ८४ जागा रिक्त आहेत. 'बीडीएस'च्या शासकीय महाविद्यालयात २, खासगी महाविद्यालयात २२ आणि खासगी विद्यापीठात ३० अशा ५४ जागा रिक्त आहेत.

स्ट्रे व्हॅकन्सीसाठी पात्रता

नीट-यूजी-२०२६ मध्ये पात्र ठरलेले व प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी केलेले व यापूर्वी ग्रुप ए अभ्यासक्रमाच्या कोणत्याही प्रवेश फेरीत जागा वाटप न झालेले उमेदवार व माहिती पुस्तिकेतील नियम ४ मधील तरतुदींनुसार पात्र उमेदवार या रिक्त जागांच्या प्रवेशासाठी पात्र राहतील.

असे असेल वेळापत्रक

१) ५ ते ७ नोव्हेंबर (दुपारी १२.०० पर्यंत) : ऑनलाइन पद्धतीने पसंतीक्रम/प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया राबविली जाईल.

२) ८ नोव्हेंबर रोजी ऑनलाइन विशेष स्ट्रे व्हॅकन्सी प्रवेश फेरी-१ चा निकाल जाहीर केला जाईल.

३) १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह वाटप झालेल्या महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश निश्चित करणे.

विटा नगरपरिषद विटा (जिल्हा सांगली)

संक्षिप्त जाहीर ई-निविदा सूचना ई-निविदा सूचना क्र. Health_Depart_work_No_०५_२०२६

मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद, विटा, जिल्हा सांगली हे आरोग्य विभागाकडून Health_Depart_work_No_०५_२०२६ (१ काम) या कामासाठी ई-निविदेतील वर्गवारीनुसार नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून ई-निविदा बी-१ पध्दतीने मागवित असून निविदा धारकांसाठी सदर ई-निविदेबाबतच्या सर्व माहिती, सूचना अटी शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून दिनांक १३/११/२०२६ रोजी सायं. ५.३० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. दाखल निविदा दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले नंतर उपलब्ध वेळेनंतर उघडण्यात येतील.

सही/- मुख्याधिकारी,
विटा नगरपरिषद, विटा

लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कॅनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001
सीआयएन: U42201DL2025GOI459301

जाहीर सूचना
लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडच्या पारेषण परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर सूचना/हरकती मागविण्याबाबत (प्रकरण क्र. 225 / 2026)

1. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड (एलआरटीएल) यांनी विद्युत अधिनियम, 2003 मधील कलम 14 आणि 15 तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, 2004 मधील तरतुदींनुसार पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. आयोगाने दिनांक 04 नोव्हेंबर 2026 रोजी सदर अर्ज दाखल करून घेतला असून, विद्युत अधिनियम, 2003 च्या कलम 15(2) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश एलआरटीएल यांना दिले आहेत.
2. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना "400/220/132 केव्ही एआयएस लातूरची उभारणी" (यापुढे "प्रकल्प") या आंतरराज्यीय पारेषण प्रणालीच्या उभारणीसाठी विशेष उद्देश वाहन म्हणून करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांमधील वीज पारेषण क्षमता वाढण्यास तसेच पारेषण पायाभूत सुविधांची विश्वासार्हता सुधारण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र शासनाने बोली प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडमार्फत राबविण्यात आलेल्या दराधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे हा प्रकल्प प्रदान करण्यात आला आहे.
3. या प्रकल्पामध्ये 400 केव्ही स्तरावर 125 एमव्हीएआर बस रिॲक्टरसह 3 x 500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी आणि 3 x 315 एमव्हीए, 400/132 केव्ही आयसीटीसह एआयएस लातूरची उभारणी करणे, तसेच एआयएस लातूर ते 400 केव्ही वाशी (प्रस्तावित) दरम्यान 400 केव्ही डी/सी पारेषण वाहिनी, एआयएस लातूर ते 220 केव्ही हरंगुळ, 220 केव्ही मुरूड, 220 केव्ही वैराग आणि 220 केव्ही नारंगवाडी (सर्व विद्यमान) दरम्यान 220 केव्ही डी/सी पारेषण वाहिन्या, सौर ऊर्जा निर्मिती केंद्रांसाठी 220 केव्ही जोडणी आणि एआयएस लातूर ते 220 केव्ही तुळजापूर आणि 132 केव्ही औसा (दोन्ही विद्यमान) दरम्यान 132 केव्ही डी/सी पारेषण वाहिन्यांची उभारणी यांचा समावेश आहे. मॉटेकॅर्लो एनर्जी लिमिटेड (एमईएल) ही निविदा प्रक्रियेनंतर यशस्वी निविदाकार ठरली असून, अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तिने लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडचे संपूर्ण इक्विटी भागभांडवल अधिग्रहित केले आहे. महाराष्ट्र राज्यातील सदर आंतरराज्यीय पारेषण प्रणालीची उभारणी, संचालन आणि देखभाल करण्यासाठी पारेषण परवाना प्राप्त करणे आवश्यक असल्याने एलआरटीएल यांनी पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.
4. आयोगाने या सूचनेद्वारे पारेषण परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश एलआरटीएल यांना दिले आहेत. अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी उपलब्ध करून देणाऱ्या नोडल व्यक्तीचा संपर्क तपशील खालीलप्रमाणे आहे:

अ. **नाव:** श्री. संदीपसिंह गोहिल
ब. **अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी उपलब्ध असलेला पत्ता:** एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कॅनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001
क. **तपासणी किंवा खरेदीसाठीची वेळ:** कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते सायंकाळी 17:00 वाजेपर्यंत.
ड. ₹100/- रोख किंवा "लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड" या नावाने मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट/धनादेश भरून तपशीलवार अर्जाची कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) सीडीसह प्राप्त करता येतील.
ई. अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी संकेतस्थळाचा पत्ता: **www.mclindia.com**

5. प्रसिद्ध करण्यात आलेल्या सार्वजनिक सूचनेच्या अनुषंगाने सूचना/हरकती दाखल करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने त्या इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या संकेतस्थळावरील 'ई-पब्लिक कन्सल्टेशन' या टॅबद्वारे अपलोड कराव्यात. ही सुविधा वापरण्यात काही अडचण आल्यास संबंधित भागधारकांनी कामकाजाच्या सर्व दिवशी सकाळी 10:00 ते सायंकाळी 17:00 वाजेपर्यंत आयोगाच्या कार्यालयाशी मोबाईल क्रमांक: 8928071522 किंवा ई-मेल: suggestions@merc.gov.in यावर संपर्क साधावा.
6. 'ई-पब्लिक कन्सल्टेशन' टॅबवर सूचना व हरकती अपलोड केलेल्या व्यक्तींना त्यांच्या निवेदनाची कोणतीही छापील प्रत सादर करण्याची आवश्यकता नाही. इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करू न शकणाऱ्या व्यक्तींनी आपली सूचना किंवा हरकत छापील स्वरूपात **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), 13 वा मजला, सेंटर क्रमांक 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – 400005 या पत्त्यावर पाठवावी**. त्यासोबत वरील मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद केलेल्या नोडल व्यक्तीला दिलेल्या पत्त्यावर त्याची प्रत पाठविल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. अशा निवेदनामध्ये पाठविणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि उपलब्ध असल्यास ई-मेल पत्ता नमूद असणे आवश्यक आहे. **07 डिसेंबर 2026** रोजी 17:00 वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.
7. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड यांना प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती/अभिप्रायाला प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर द्यावे लागेल. तथापि, **07 डिसेंबर 2026** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांना **10 डिसेंबर 2026** पर्यंत उत्तर देणे बंधनकारक असेल.

ठिकाण: लातूर
दिनांक : 06 नोव्हेंबर 2026

श्री. संदीपसिंह गोहिल
(अधिकृत स्वाक्षरीकर्ता)

महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगासमोर

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक MPSC-११२६/CR२८८/MPSC, दि. १६/१०/२०२६ अन्वये गठित)

तक्रार / निवेदनाचे समर्थनार्थ प्रतिज्ञापत्र

मी, श्री. श्रीमती ——————————————————————————वयः ——————————— वर्षे,

व्यवसायः ——————————————————— राहणारः——————————————————————————.

——,

Whatsapp मोबाइल क्रमांकः ——————————————————————————————————————,

ई-मेलः ——,

याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर (शपथपूर्वक) खालीलप्रमाणे कथन करून लिहून देतो/देते की:

१. मी भारताचा/भारताची नागरिक असून, वर नमूद केलेल्या पत्त्यावर कायमस्वरूपी वास्तव्यास आहे.

२. मला याची पूर्ण माहिती आहे की, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक MPSC-११२६ /C.R. २८८/MPSC, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२६ अन्वये, सदर शासन अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या एकूण ९ परीक्षांचे संदर्भात विशेष न्यायालयीन चौकशी आयोगाची स्थापना केली आहे.

३. सदर चौकशी आयोगाची पहिली बैठक दिनांक २८/०९/२०२६ रोजी घेण्यात आली आणि सदर बैठकीत ठरविण्यात आल्याप्रमाणे, चौकशी आयोगातर्फे दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटिशीने (Public Notice) उपरोक्त नमूद परीक्षांबाबत तक्रारी / हरकती / निवेदन, योग्य त्या प्रतिज्ञालेखासह आयोगासमोर दाखल करण्याचे आवाहन केले आहे. मी सदर जाहीर नोटीस वाचली आहे आणि मी हे प्रतिज्ञापत्र माझी तक्रार / हरकत / निवेदन याचे समर्थनार्थ सादर करीत आहे. मी याद्वारे शपथपूर्वक असे नमूद करतो/करते की, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२६ च्या जाहीर नोटिशीनुसार मी आयोगासमोर दाखल करत असलेल्या माझ्या सदर निवेदनामध्ये / तक्रारीमध्ये नमूद केलेला सर्व मजकूर आणि त्यासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे व पुरावे हे माझ्या वैयक्तिक माहितीनुसार, ज्ञानानुसार व समजुतीनुसार पूर्णपणे खरे आणि अचूक आहेत.

(दिनांक ३०/१०/२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यापूर्वी ज्यांनी तक्रार दाखल केली आहे त्यांनी पुढील परिच्छेद वापरावा)

४. मी याद्वारे शपथपूर्वक असे नमूद करतो/करते की, चौकशी आयोगाने दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यापूर्वी मी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नमूद नऊ परीक्षांमध्ये गैरव्यवहार किंवा प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका किंवा त्यांचा कोणताही भाग फुटल्याच्या घटनांशी संबंधित माझी सविस्तर तक्रार / हरकत / निवेदन, दिनांक ——————- रोजी ——————- यांचे कार्यालयात रीतसर दाखल केलेली आहे. माझी सदर तक्रार / हरकत / निवेदन यामध्ये नमूद केलेला मजकूर हा याच प्रतिज्ञापत्रामध्ये, जसाचा तसा नमूद केला आहे असे समजून, सदर तक्रार । हरकत / निवेदन आणि त्यासोबत जोडलेले पुरावे, कागदपत्रे, इ. याच प्रतिज्ञापत्राचा भाग समजण्यात यावेत.

किंवा

(दिनांक ३०/१०/२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर ज्यांनी तक्रार दाखल केली आहे अथवा करावयाची आहे त्यांनी पुढील परिच्छेद वापरावा)

४. मी याद्वारे शपथपूर्वक असे नमूद करतो/करते की, चौकशी आयोगाने दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर मी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नमूद नऊ परीक्षांमध्ये गैरव्यवहार किंवा प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका किंवा त्यांचा कोणताही भाग फुटल्याच्या घटनांशी संबंधित माझी सविस्तर तक्रार / हरकत / निवेदन, आयोगाचे कार्यालयीन पत्त्यावर दिनांक ——————- रोजी दाखल केली आहे। आज रोजी या प्रतिज्ञापत्रासोबत दाखल करीत आहे.

५. माझी सदर तक्रार / हरकत / निवेदन यामध्ये नमूद केलेला मजकूर हा या प्रतिज्ञापत्रामध्ये, जसाचा तसा नमूद केला आहे असे समजून, सदर तक्रार / हरकत /निवेदन आणि त्यासोबत जोडलेले पुरावे, कागदपत्र, इत्यादी याच प्रतिज्ञापत्राचा भाग समजण्यात यावेत. मी शपथपूर्वक नमूद करतो की माझी सदर तक्रार / हरकत / निवेदन यामध्ये नमूद केलेला सर्व मजकूर आणि त्यासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे व पुरावे हे माझ्या वैयक्तिक माहितीनुसार, ज्ञानानुसार व समजुतीनुसार पूर्णपणे खरे आणि अचूक आहेत.

६.. मी दाखल केलेल्या तक्रार / हरकत / निवेदन यामधील कोणताही भाग खोटा नाही किंवा त्यामध्ये कोणतीही महत्त्वाची माहिती माझ्याकडून लपवून ठेवण्यात आलेली नाही.

(हा नमुना स्वरूपाचा (Indicative Format) आहे. आवश्यक असल्यास अर्जदार या स्वरूपात बदल करू शकतो.)

दिनांकः / / २०२६

(सही)

(नाव ——————————)

सत्यापन

मी, वर नमूद केलेला / केलेली शपथकर्ता, याद्वारे सत्यापित करतो/करते की, या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद १ ते ६ मध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार व विश्वासाने पूर्णपणे खरी आणि बरोबर आहे.

स्थळः —————————— दिनांकः / /२०२६	शपथकर्ता (सही) (नाव ——————————)

समक्ष
[DGIPR-2026-27/NO.5/C-3673] (नोटरी / सक्षम दंडाधिकारी यांची स्वाक्षरी आणि शिक्का)